आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ एप्रिल २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांची छाननी पूर्ण, ८ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार

- गेल्या दहा वर्षांत सरकारनं सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्या असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात युवकांना रोजगार, बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी, पिकाला हमीभाव, जात आधारित जनगणनेचं आश्वासन

- रिझर्व्ह बँकेच्या, नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण आढाव्यात व्याजदर जैसे थे /युपीआयद्वारे पैसे जमा करण्यासाठी लवकरच परवानगी

- महाराष्ट्रासह देशाच्या पूर्व आणि किनारपट्टीच्या काही भागात येत्या दोन दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सामन्यात, नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा सनरायझर्स हैदराबादचा निर्णय

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दाखल झालेल्या अर्जांची छाननी आज झाली.

महाराष्ट्रात, **बुलडाणा** मतदारसंघासाठी उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर ४ उमेदवारांचे अर्ज बाद झाले आहेत. बुलढाणा मतदारसंघातले भाजपाचे विजयराज शिंदे आणि शिवसेनेचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचे अर्ज बाद झाले आहेत. **नांदेडमध्ये** ६६ उमेदवार पात्र तर ८ उमेदवार अपात्र ठरले आहेत. कालपर्यंत ७४ उमेदवारांनी ९२ अर्ज दाखल केले होते. **अकोला** मतदारसंघासाठी कालपर्यंत २८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननीनंतर १७ उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यात आले. **परभणी** मतदारसंघासाठी ४२ उमेदवारांनी ६५ उमेदवारी अर्ज दाखल केले. आज झालेल्या छाननीत एक अर्ज अवैध ठरला आहे. **हिंगोली** मतदारसंघात ४८ उमेदवारांचे अर्ज वैध, तर ७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. ८ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. या टप्प्यात २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

गेल्या दहा वर्षांत सरकारनं सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज राजस्थानमध्ये शेखावती भागात चुरू इथं प्रचार सभेला संबोधित केलं. गेल्या दहा वर्षांत विकसित भारताचा पाया तयार झाला असल्याचं त्यांनी म्हटलं. सत्तेत आल्यानंतर सरकारनं प्रामाणिकपणे काम केलं असून देश झपाट्यानं प्रगती करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात ५ न्याय आणि २५ गॅरंटी या शीर्षकाखाली युवकांना रोजगार, न मिळाल्यास वार्षिक १ लाख रुपये बेरोजगारी भत्ता,  गरीब महिलांना वार्षिक १ लाख रुपये अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि पिकाला हमीभाव, मनरेगामार्फत किमान **४०० रुपये**

**दर रोज** मजुरी, सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी जात आधारित जनगणना, संवैधानिक संस्थांचं जतन, इत्यादी मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे.

**<><><><><>**

काँग्रेसचा जाहीरनामा खोटेपणावर आधारित असल्याचा आरोप आज भाजपानं केला. हा जाहीरनामा मतदारांच्या मनात गोंधळ निर्माण करणारा असल्याचं भाजपाचे प्रवक्ता सुधांशु त्रिवेदी यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांना सांगितलं. या आधीच्या निवडणुकांमधेही जाहीरनाम्यात दिलेली कोणतीही आश्वासनं काँग्रेसनं पूर्ण केलेली नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली. या जाहीरनाम्याचं नाव न्यायपत्र असलं तरी काँग्रेसनं आत्तापर्यंत देशावर अन्यायच केल्याचं त्रिवेदी म्हणाले.

**<><><><><>**

मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागासाठी वेगवेगळा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या भागातल्या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक त्यांनी आज नवी दिल्लीत घेतली. या बैठकीमध्ये राज्यातल्या मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, पालिकांचे आयुक्त सहभागी झाले.

**<><><><><>**

गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात देसाईगंज आणि चामोर्शी इथं आज ज्येष्ठ भाजपा नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रचारसभा घेतल्या. भाजपा उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ आयोजित या सभांमधे गडकरी यांनी गडचिरोली जिल्ह्यातल्या विकासकामांची माहिती दिली. गडचिरोली जिल्ह्यात चांगले रस्ते झाल्यानं तिथं उद्योग सुरु होत आहेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर

रोजगाराची संधी मिळणार असून, येत्या दहा वर्षांत हा जिल्हा राज्यातला सर्वांत श्रीमंत जिल्हा असेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग सातव्यांदा रेपो दर साडे सहा टक्के ठेवला आहे. बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. रेपो दरात कोणताही बदल केला नसल्यानं गृहकर्ज महाग होणार नाही. चलनफुगवटा दरातली स्थिरता आणि आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचं दास यांनी वार्ताहरांना सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं २०२४- २५ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात टक्के तर किरकोळ महागाई दर साडे चार टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३मध्ये रेपो दर साडे सहा टक्के केला होता.

<><><><><>

बँकेत रक्कम जमा करण्यासाठीच्या यंत्रांमधे युपीआयचा वापर करून  पैसे जमा करण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच परवानगी देणार आहे. या सुविधेमुळे ग्राहकांची सोय होईल आणि बँकामध्ये पैसे हाताळण्याची प्रकिया अधिक कार्यक्षम होईल असं गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं पीपीआय वाॅलेटमधून युपीआयद्वारे व्यवहार करण्यासाठी अन्य ॲप्स वापरण्याची परवानगी देण्याचाही प्रस्ताव दिला आहे.

<><><><><>

महाराष्ट्रासह ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, कर्नाटक, आंध्र प्रदेश, पुद्दुचेरी, आणि तेलंगण या देशाच्या पूर्व आणि किनारपट्टीच्या काही भागात येत्या दोन दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली

आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये पुढील चार दिवस विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांची शक्यता आहे. कर्नाटक आणि गोव्याच्या किनारी भागात उद्यापर्यंत आणि केरळ, तामिळनाडू पुद्दुचेरीमध्ये मंगळवारपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील. ईशान्य भारतात मंगळवारपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा इथं हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. या आठवड्यात जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये हलका पाऊस आणि हिमवृष्टी होईल.

**<><><><><><>**

भारतीय जनता पक्ष उदया ६ एप्रिल हा पक्षाचा स्थापना दिवस विविध उपक्रमाद्वारे राज्यात साजरा करणार आहे. यामध्ये बूथ यात्रा, मोदी ॲप द्वारे भाजप सदस्यत्व, ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यकर्त्यांच्या टिफिन बैठकीतून अभिवादन, १४ एप्रिलला डॉ .बाबासाहेब आंबेडकरांची जयंती, असे उपक्रम राबवले जाणार आहेत. तसंच ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार देखील केला जाणार आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सभा चंद्रपूरला ८ एप्रिल रोजी, तर रामटेक लोकसभा मतदार संघात कन्हान इथं १० एप्रिलला होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात १४ सभांची विनंती केली असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

भारतानं मालदीवला २०२४-२५ या वर्षासाठी आजपर्यंतचा सर्वात मोठा निर्यात कोटा मंजूर केला आहे. मालदीवमधे बांधकाम उद्योगाला चालना देण्यासाठी महत्त्वाचा असलेला, नदीतली वाळू आणि दगडांचा कोटा २५ ट्क्क्यांनी वाढवून

१० लाख टन केला आहे. तर अंडी, बटाटे, कांदे, साखर, तांदूळ, गव्हाचं पीठ आणि डाळींच्या कोट्यातही ५ टक्के वाढ केली आहे. मालदीव सरकारच्या विनंतीवरुन या निर्यातीला परवानगी दिली असल्याचं मालदीवमधल्या भारतीय उच्च आयोगानं जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ९ षटकात २ बाद ८० धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण अकोला लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**//<><><><><><>//**